कामगार विभागाची दिनांक २४ ऑक्टोबर २०१३ व दिनांक ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी निर्गमित केलेली परिपत्रके सुधारीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन परिपत्रक क्र. इबांका २०१७ / प्र.क्र.३८६ / कामगार-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१८

वाचा : उद्योग, उर्जा व कामगार विभाग परिपत्रक क्र. इबांका २०१७/प्र.क्र.३८६/काम-७, दि.७.१२. २०१७

परिपत्रक-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) नियम २००७ च्या नियम ४६ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास मार्गदर्शन करण्याकरिता दिनांक २४ ऑक्टोबर २०१३ व दिनांक ०८ नोव्हेंबर २०१६ रोजी निर्गमित केलेली शासन परिपत्रके रद्द करण्यास संदर्भाधीन दिनांक ०७ डिसेंबर, २०१७ च्या परिपत्रकाद्वारे शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर परिपत्रकामध्ये परिच्छेद क्र.३ च्या शेवटी खालील वाक्याचा समावेश करण्यात येत आहे.

"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे असे प्रस्ताव शासन मान्यतेस्तव पाठविताना कामगार आयुक्त यांनी मुख्य निरिक्षक या नात्याने प्रमाणित करुन ते स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पाठवावेत."

२. सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०२२७१२०७३३९७१० असा आहे. तसेच सदर शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.02.28 11:03:19 +05'30'

(श.मा.साठे)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
२) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.

४) मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे स्वीय सहायक.

५) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.

६) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७) विकास आयुक्त, असंघटीत कमगार, मुंबई

८) सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

९) अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.

१०) उप कामगार आयुक्त, मुंबई/ ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद.

११) निवडनस्ती (कामगार-७).